नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०५/०४/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## जबरी चोरी

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील आंबेडकर नगर वार्ड क्र. ५ मनसर येथे दिनांक ०३/०४/२०२२ चे २२:०० वा. सुमारास फिर्यादी नामे– आदित्य रविंद्र वाघमारे वय १८ वर्ष, रा. सींधी रेल्वे, वार्ड क्र. १६ पिपळा रोड वाघमारे कॉलनी ता. सेलु जि. वर्धा हा त्याचा मित्र सरफराज याचे सोबत एम. एच–३२/एजी–६४७३ क्रमांकाच्या होन्डा शाईन मोटरसायकलने बहीणीचे लग्न कार्याकरीता नवीन कपडे खरेदी करून नागपुर येथुन मित्रासह मोटरसायकल ने गावी परत जात होता. त्यादरम्यान पल्सर मोटरसायकल वरील तिन अज्ञात आरोपीतांनी फिर्यादी व त्याचा मित्र सरफराज यांचे मोटरसायकला समोरून येवुन धडक दिली. या अपघातात सरफराज याला हेल्मेट ने डोक्यावर मारून व चाकुने हातावर मारून जखमी केले. तसेच फिर्यादी जवळील नगदी ८००/–रू., सॅमसंग गॅलेक्सी मोबाईल, एक साहीत्य असलेली बॅग व मित्र सरफराज याचा आयफोन कपंनीचा मोबाईल असे एकुण कि. ११,८००/– रूपयाचे साहीत्य जबरीने चोरी करून पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी साखरकर मो. क्र. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०८ कि.मी. अंतरावरील मौजा नगरधन येथे दिनांक ०४/०४/२०२२ चे ०८:०० वा. ते ०८:२० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ.दुर्गा विकास बिरनवार, वय ३६ वर्ष, रा.नगरधन ता.रामटेक व आरोपी नामे– रामचंद्र अयोध्याजी माहुले, वय ५२ वर्ष रा.नगरधन हे आमोरा–समोर राहत असुन यांचे जुने वाद आहे. यातील आरोपीने फिर्यादीचे पतीस 'तु माझ्या मुलीची बदनामी का करतो' असे म्हणुन लाकडी दांडयानी फिर्यादीचे पतीला दोन्ही हातावर,पायावर,कमरेवर मारून गंभीर जखमी करून दोन्ही हात फॅक्चर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा राजेन्द्र अडामे मो.क्र. ९६३७४००८७३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर